E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B)

# Humanities & Indian Knowledge System




**Guest Editor**
Prof.Dr. S. V. Patil
Act. Principal
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Comm.College, Bhusawal

**Executive Editor**
Dr. A. D. Goswami
Vice-Principal & Head, Dept. of Economics

**Executive Editor**
Prof. Dr. B. H. Barhate
Vice-Principal

**Associate Editor**
Prof. Dr. Prafull Ingole
Head, Department of History

**Associate Editor**
Prof. Dr. Sachin Rajput
Department of Philosophy

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Comm. College, Bhusawal

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# Index


| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | Portrayal of Nature in John Steinbeck's novels | **Dr. B. N. Kesur**<br>**Dipak Namdeo Patil** | 05 |
| 2 | पशुपालन आणि भारतीय ज्ञान पद्धती | प्रा.डॉ.ए.डी.गोस्वामी<br>श्री. अमोल श्रावण बावस्कर | 10 |
| 3 | आयुर्वेद : एक भारतीय चिकित्सा पद्धतीचा महान वारसा | डॉ. प्राची पाटील | 15 |
| 4 | मराठी संप्रदाय आणि भारतीय ज्ञान परंपरा | डॉ.दीनानाथ रघुनाथ पाठक<br>प्रो.किशोर रघुनाथ पाठक | 17 |
| 5 | Varkari Sampradaya: An all Inclusive Sect of Bhakti Sampradaya | **Dr. Kiran Save**<br>**Kirti N. Mardikar** | 21 |
| 6 | लोकशाहीत जबाबदार नागरिकत्वाची आवश्यकता : एक विश्लेषणात्मक अभ्यास | स्वप्नील भास्कर पालवे<br>प्रा.डॉ.शुभांगी डी. राठी | 24 |
| 7 | भारतीय ज्ञान परंपरेतील आंबेडकरी काव्य आणि मानवतावाद | प्रा. खिवैया काळू अहिरे | 27 |
| 8 | भारतीय साहित्य ज्ञानपध्दती में हिंदी साहित्य की नवगीत विधा | डॉ. जगदीश बन्सीलाल चव्हाण | 30 |
| 9 | भारतीय ज्ञानपध्दती में हिंदी ग़ज़ल विधा का योगदान | प्रा. डॉ. मनोज एन. पाटील | 34 |
| 10 | शिवाजी महाराजांच्या साम्राज्यातील आरमार आणि लष्करी व व्यवस्थेचा तुलनात्मक चिकित्सक अभ्यास | डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ | 38 |
| 11 | भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक सत्तेचा खर्च विषयक बदलता दृष्टिकोन | प्रा.सुनिल दशरथ अडकमोल<br>प्रा. डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे | 40 |
| 12 | भारतीय ज्ञान पध्दती में हिंदी उपन्यास साहित्य का योगदान 'प्रेमचंद के विशेष संदर्भ में' | डॉ. हुकूमचंद शंकर जाधव | 43 |
| 13 | The Embodiment of True Gentility in Dickens' *Great Expectations.* | **Bhalerao Vaibhav Sunil** | 46 |
| 14 | प्राचीन मराठी जैन साहित्यातील भारतीय ज्ञान परंपरा | डॉ.पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन | 48 |
| 15 | भारतीय ज्ञान परंपरा में हिंदी ग़ज़लों का योगदान | प्रा. डॉ. रविंद्र रामदास खरे | 51 |
| 16 | भारतीय ज्ञान परंपरा में कबीर की भक्ति | डॉ. कृष्ण बिहारी रॉय | 55 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला स्वातंत्र्या विषयी विचार | डॉ.राजेंद्र नाडेकर | 57 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून - स्त्रीविषयक भारतीय ज्ञानपद्धती | प्रा. व्ही.ए. सोळुंके<br>डॉ. विनोद नन्नवरे | 60 |
| 19 | Effects of occupational disease on the Indian Railway Employees of India Streme : Commerce & Management | **Prof. Smita N.Bendale**<br>**Prof.Dr.A.I.Bhangale** | 63 |
| 20 | Comparative Study of Online and Offline Home Loan Application System with special reference to Jalgaon District | **Jayashree A. Chaudhari**<br>**Dr. Harish Purohit** | 67 |
| 21 | लोकसाहित्य आणि ज्ञानपद्धती | प्रा.वंदना रमेश महाजन | 71 |
| 22 | मध्ययुगीन मराठी संतांची शिकवण | डॉ. दिपक दिनकर किनगे | 74 |




Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

22

# मध्ययुगीन मराठी संतांची शिकवण

**डॉ. दिपक दिनकर किनगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

---

मध्ययुगीन महाराष्ट्रात व्रते, वैकल्ये, यज्ञयागादी कार्मकांडावर समाजातील उच्चवर्नियांचा भर होता. तर खालच्या समाजास खऱ्या धर्माचे स्वरूप अज्ञात होते. मध्ययुगीन समाजात अनेक अनिष्ट चालीरीती, कुप्रथा, अंधश्रद्धा यांनी समाज ग्रासलेला होता. समाजामध्ये चातुर्वर्ण व्यवस्थेला खूप महत्त्व प्राप्त झाले होते. आणि उच्चवर्णीय लोक धार्मिक विधी-कर्मकांड यात समाधान मानत होते. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर कर्मकांडाचे स्तोम माजले होते. या सर्व सामाजिक परिस्थिती विरोधात बंड करून महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न तत्कालीन मराठी संतांनी केलेला दिसून येतो. कनिष्ठ समाजातील सर्व लोक सामाजिक गुलामगिरी मध्ये जीवन जगत होते. त्यांची सामाजिक गुलामगिरी दूर सारून त्यांना स्वाभिमानाने जगण्याचे धाडस संतांनी प्राप्त करून दिले. याशिवाय तत्कालीन समाज हा जाती-पातीमध्ये विभागलेला होता. संतांनी जातिभेद आणि अस्पृश्यतेला विरोध करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा करण्याची शिकवण दिली.

मध्ययुगीन महाराष्ट्रात संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा या संतांपासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी पुढे चालविली. त्यामध्ये संत परिसा भागवत, संत सावता, संत सेना, संत नरहरी, संत एकनाथ, संत शेख महंमद, संत तुकाराम, समर्थ रामदास इत्यादी विविध संतांचा अंतर्भाव होतो. समाजातील सगळे लोक सारखे आहेत अशी समतेची भावना संतांनी लोकांच्या मनांत निर्माण केली. त्यांनी लोकांना दया, परोपकार, सेवा, समता, ममता, बंधुभाव इत्यादी गुणांची शिकवण दिली. संतानी मध्यायुगीन महाराष्ट्रात केलेल्या या महत्त्वपूर्ण सामाजिक कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**संत नामदेव--** संत नामदेव विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. त्यांनी अनेक अभंग रचले, कीर्तने केली व जनतेत जागृती निर्माण केली. त्यांनी लोकांना भक्तीची शिकवण देऊन धर्मरक्षणाचा व भक्तिमार्गाचा खंबीर निर्धार लोकांच्या मनांत निर्माण केला. आणि मानवधर्माचा संदेश समाजात पोचवला.

संत नामदेवांनी तीर्थव्रते दानधर्म दक्षिणा याद्वारे होणारी समाजातील लोकांची लूट थांबविण्यासाठी व अस्पृश्यता दूर करण्यासाठी सर्वाभूती समदृष्टीचे वर्म असलेला नाम धारकांचा भागवत धर्म संघटित केला त्याच्या प्रसार अर्थ कीर्तन संप्रदाय निर्मला कीर्तनासाठी अभंग वृत्त निर्माण करून त्यात गेयता आणली सर्व जाती जमाती व सर्व पंथ संप्रदाय एका झेंड्याखाली आणून त्यांच्या झुंडी जमविल्या व ह्या झेंड्यांना दिंडीत परिवर्तित केले त्यासाठी पहिला वारकरी फडही निर्माण केला असा हा महाराष्ट्राचा सुपुत्र पंजाब, राजस्थान, हरियाणा या भागातील आपल्या स्वधर्मीयांच्या सेवेसाठी धावून गेला तेथे त्यांनी सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[१]

**संत ज्ञानेश्वर --** संत ज्ञानेश्वरांच्या काळात धर्माचे ज्ञान संस्कृत ग्रंथांमध्ये बंदिस्त झाले होते. सर्वसामान्य लोकांची बोलण्याची व व्यवहाराची भाषा मात्र मराठी होती. सर्व धर्मग्रंथ पंडितांच्या हातात असल्यामुळे आणि त्यातील तत्वविचार संस्कृतात सांगितले असल्यामुळे बहुजन समाजापासून हे वैभव दुरावले होते. या सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी धर्माचे स्वरूप गीतेवर आधारित होते.[२] ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतून 'ज्ञानेश्वरी' हा फार मोठा ग्रंथ लिहिला. धर्माच्या ज्ञानाचे भांडार त्यांनी लोकांना खुले करून दिले. लोकांना बंधुभावाची शिकवण दिली.

आपल्या भोवतालच्या सामाजिक जीवनात त्यांना खऱ्या धर्माचे उज्वल स्वरूप कुठेच दिसून आले नाही. म्हणून त्यांनी समाजाचे धार्मिक प्रबोधन करण्यास प्रारंभ केला. आत्मानुभवी संताच्या सामाजिक जबाबदारीचे तत्व त्यांनी प्रतिपादित केले आणि स्वतः त्याचे आचरण केले. मराठी भाषेच्या नगरीत म्हणजे महाराष्ट्रात ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची त्यांची इच्छा होती. आपले हे कार्य म्हणजे धर्मकार्य आहे असे ते मानत होते.[३]

**संत चोखामेळा--** पंढरीची वारी कधीही न चुकविणारे संत चोखामेळा म्हणजे भाविकांचे श्रद्धास्थान. संत चोखामेळांच्या अभंगातून तत्कालीन सामाजिक विषमता, अन्याय व सोवळे-ओवळे याविषयीची सल व्यक्त झालेली आहे. त्यांच्या अभंग रचनेतील साधेपणा व रसाळपणा हा समाज मनाला स्पर्श करतो.[४]

चोखा म्हणे ऐसा पडिलो काचणी। सोसु हे जाचणी कोठवरी।।



Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

सोवळे-ओवळ्याबद्दल आपण उच्चवर्णी यांना नावे ठेवतो, पण अतिशूद्रांना लाचारीचे व लज्जास्पद जिने नको असेल तर त्यांना नशिबावर भिस्त ठेवून चालणार नाही, आपल्यातील दोष त्यांनी काढून टाकले पाहिजेत. चोखामेळा हे हरिभक्त असल्याने आपल्या विचारात, उच्चारात आणि आचारात शुद्धता राखण्याची त्यांची खटपट होती. त्यांच्या उपासनेला उच्चवर्णीयांनी आणि बऱ्याचदा स्वकीयांनीही विरोध केला. त्यामुळे स्वकीयांची नाराजी व उच्चवर्णीयांचा रोष अशा दोन्ही बाजूंनी ते पेचात पडले. तरी देखील आपल्या अंत:प्रेरणेशी इमान राखून स्वीकारलेला मार्ग त्यांनी जाणीवपूर्वक सोडला नाही.[५]

आपल्याला समाजात आलेल्या अनुभवांचे वर्णन संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून केले. त्यांच्या अनुभवाला तत्त्वज्ञानाचा स्पर्श आहे.

"ऊस डोंगा परी रस नये डोंगा| काय भुललासी वरली रंगा||"[६]

आपण हीन जातीत, दारिद्र्यात, विवंचनेत जगत असलो तरी आपली भक्तीभावना पवित्र, प्रामाणिक व शुद्ध आहे. म्हणून बाह्य रूपाला महत्व न देता अंतर्मन बघावे हि शिकवण संत चोखामेळा वरील पंक्तींमधून देतात.

**संत परिसा भागवत--**संत परिसा भागवत हे संत नामदेवांच्या समकालीन होते. परमार्थिक उंची ही जाती धर्मावर ठरत नाही, तर सदाचार व पूर्वसुकृतावर ठरते, हे वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य परिसा भागवत यांच्या उदाहरणावरून महाराष्ट्राला समजते. पंढरपूरवासी परिसा भागवत यांना आपल्या विद्वत्तेचा व ब्राह्मण्याचा अतिअभिमान होता. वास्तविक नामदेवांची नम्रता बघून परिसा भागवत यांच्यात परिवर्तन होणे आवश्यक होते. परंतु जेव्हा नामदेवांनी परिसा भागवत यांना चरण स्पर्श केला तेव्हा पैसा भागवतांचा अहंकार सुखावला. मात्र त्यांना संत नामदेवांची संपूर्ण प्रचिती आल्यानंतर ते नामदेवांना शरण गेले आणि म्हणाले

"गळोनिया गेला त्याचा अभिमान। झाला तेव्हा लिन संतांपायी।।"[७]

यावरून व्यक्तीला संतांची सांगत लाभल्याने अभिमानी माणसाचे गर्वहरण होऊनतो संतांना शरण जात असल्याची शिकवण मिळते.

**संत सावता माळी --**"प्रपंच व परमार्थ यांच्या समन्वयावर भर देणारे जीवनवादी संत" हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

"काम करता करता। देख देवाजीच रूपा"

असे आपल्या स्वतःच्या अनुभवातून सांगताना सावता माळी म्हणतात, भक्ती मार्गातील कर्मवाद साधण्यासाठी आणि परमेश्वर प्राप्तीसाठी संसाराचा त्याग करण्याची गरज नाही, जप- तप, तीर्थयात्रा करण्याची गरज नाही नामस्मरणाच्या सुलभ मार्गाने परमेश्वराची भेट होते. आपले सर्व अनुभव, आपल्या कामातील प्रामाणिकपणा म्हणजेच देव. आपल्या वाट्याला आलेले काम निष्ठेने करायची गरज असते. आध्यात्मप्रधान कर्मयोगाचा सोपा विचार त्यांनी आपल्या अभंगातून पुढीलप्रमाणे मांडला आहे –

"कांदा मुळा भाजी। अवघी विठाई माझी।
लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी।।[८]

त्यांनी स्वतःच्या उक्ती आणि कृतीमधून महाराष्ट्रातील सर्व लोकांपर्यंत ही शिकवण पोहोचवली.

**संत सेना महाराज**

आम्ही वारिक वारीक। करू हजामत बारीक।।

या आपल्या अभंगातून संत सेना महाराजांनी आपला व्यवसाय सांभाळीत हरिभक्ती केली आहे. आपल्या व्यवसायातील साहित्यावरच त्यांनी सुंदर रूपक साधले आहे. ते म्हणतात आम्ही जातीने वारीक असलो तरी आम्ही आमचे कार्य करीतच विठ्ठलाची भक्ती मनभावे करीत असतो.

मान करावा खंडण। दुर्जनांचा सुखी करून ।।
लाथा हाणूनी घाला दूरी। निंदकासी झडकरी।।
त्याचा जाणावा विटाळ। लोका पिडितो चांडाळ।।
त्याची संगत जयशी। सेना म्हणे नरकवास।।

म्हणजे दुर्जनांचा दुष्टांचा मान करू नये, त्यांना लाथा घालून दूर करावे, त्यांचा विटाळ जाणावा. कारण हे दुर्जन लोक सर्वसामान्यांना मिळतात त्रास देतात. अशा लोकांची संगत गेले केल्यास संगत करणाऱ्याला नरकवासच प्राप्त होतो. म्हणून संतांची संगत करावी आणि दुर्जनांपासून दूर राहण्याची शिकवण संत सेना महाराज देतात.[९]

**संत नरहरी सोनार**

देवा, तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार।।

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

आपण व्यवसायाने सोनार असलो तरी आपण नित्य पांडुरंगाच्या नामस्मरणाचा व्यवहार करीत असल्याचे त्यांनी आपल्या या वरील अभंगातून दाखवून दिले आहे.

हरिनाम उच्चारी देवकृपा करी। भक्तांचा कैवारी पांडुरंग॥

या आपल्या अभंगातून पंढरीरायाचे नाम हे अमृत आहे आणि ते नाम हृदयात निरंतर जपून ठेवले पाहिजे, असे नरहरी सोनार म्हणतात. नामस्मरण हे संतांचे माहेर आणि प्रेम-सुखाचे आगर आहे. नामस्मरण भक्तीने जनसामान्यांनी भक्तीयोगाचा मार्ग आचरणात आणावा, अशी शिकवण ते देतात. कर्मपूजा हीच नामभक्ती आहे, असे ते मानत. आपल्या वाटेला आलेले कोणतेही कर्म हलके न मानता, ते मनोभावे करून तीच देवपूजा आहे अशी श्रद्धा मानून समाजापुढे एक आदर्श त्यांनी ठेवला. कर्मपूजा हीच नाम भक्ती आहे, असा संस्कार त्यांनी समाजमनावर केलेला दिसून येतो.[१०]

**संत एकनाथ महाराज**-संत एकनाथांनी आपल्या आयुष्यात जन्मसिद्ध भेदभावाला कधीच थारा दिला नाही. आयुष्यभर सामाजिक समतेचा सिद्धांत त्यांनी असंधिग्ध शब्दात सांगितला. त्या काळात मराठी भाषेची अगदी दुर्दशा होऊन गेली होती. राजकीय व व्यावहारिक क्षेत्रात फारशी भाषेचे प्राबल्य माजले होते. अशा स्थितीत महाराष्ट्रातील प्रतिष्ठित व बुद्धिमान वर्गाचे मराठी भाषेकडे लक्ष वेधण्याचे अवघड कार्य संत एकनाथांना पार पाडावयाचे होते. म्हणून

"संस्कृत वाणी देवी केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली?"

असा प्रश्न त्यांनी उच्चवर्णीय समाजाला विचारला होता. त्यामुळे सहाजिकच महाराष्ट्रातील पंडितबुवांची मराठी भाषेकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित दृष्टी बरीचशी निवळली होती.[११]

संत एकनाथ स्वभावाने शांत वृत्तीने पुरोगामी आणि मनाने कनवाळू होते. भरदुपारी वाळूत तडफडणारे महाराचे पोर दयेने उचलून त्यांनी त्या मुलाचा विटाळ न मानता त्या सावलीत उचलून ठेवले. तहानेने व्याकुळलेल्या गाढवास जवळील गंगाजल पाजून त्यास वाचविले. असा "भूती भगवंत पाहणारा" त्यांचा भागवत धर्मी आचार होता. भेदरहित वारीच्या या वारकऱ्यांनी सर्वाभूती समभाव दृष्टीने वर्तणूक ठेवली. त्यांनी अस्पृश्यता मानली नाही.[१२]

भक्तिमार्गाचा प्रसारकरण्यासाठी त्यांनी अनेक अभंग, ओव्या व भारुडे लिहिली. कोणताही उच्चनीच भेदभाव मानू नका, असा त्यांनी लोकांना उपदेश केला. भक्तीचा मोठेपणा त्यांनी लोकांना पटवला. गोरगरिबांना, दिनदलितांना जवळ केले. इतकेच नाही, तर मुक्या प्राण्यांवरदेखील त्यांनी दया केली. अशा रीतीने स्वत:च्या आचरणातून एकनाथांनी समतेची व ममतेची भावना आणि बंधू-भाव लोकांच्या मनावर बिंबवला.

**संत शेख महंमद**

नरदेहाची सार्थकता होण्याकरिता अहंकार सोडावा लागतो. संताप व अनुराग असे देहातील दोन शत्रू बाहेर काढावे लागतात. देहाचे सार्थक होण्यासाठी कल्पना, वासना, संकल्प, विकल्प यांचा त्याग केला पाहिजे. त्यागाशिवाय परमार्थाची वाटचाल शक्य नाही. परमार्थ साधण्यासाठी नि:संग व्हावे लागते. पारमार्थिक निर्लज्जपणा अंगी यावा लागतो. लोकलज्जा टाकावी लागते. अनेक वेळा मनात असूनही लोकलज्जेसाठी मानव परमार्थाची वाटचाल करण्यास घाबरतो म्हणून शेख महंमद म्हणतात-

नि:संग निर्लज्ज होईल वो धांगडी । मग तुज लागेल गोडी परब्रम्हाची॥[१३]

"सच्चा पीर कहे मुसलमान। मऱ्हाटे म्हणतो सद्गुरु पूर्ण॥
परी दोन्हीच नाही भिन्नपण। आंखे खोल देखो भाई॥"[१४]

हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मात वेगळे तत्व नसल्याचे शेख महंमद वरील काव्यातून सांगतात. आणि म्हणून लोकांनी डोळसपणे पाहिल्यास दोन्हीधार्मात समानता दिसेल असे ते म्हणतात.

**संत तुकाराम महाराज**

संत तुकाराम हे पुण्याजवळील देहू जवळच्या डोंगरावर जाऊन ते विठ्ठलाचे भजन करत. आषाढी-कार्तिकीला कीर्तन करत, अभंग रचत आणि पंढरीला जात. ते अभंग लोकांना म्हणून दाखवत. हजारो लोक त्यांच्या कीर्तनाला येत. शिवरायसुद्धा त्यांच्या कीर्तनाला जात असत. संत तुकाराम लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देत, समतेचा उपदेश करत –

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
'तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥

हि शिकवण त्यांनी लोकांच्या मनावर बिंबविली.

पांडुरंगाचा सेवक म्हणून समाजाच्या उन्नतीसाठी, बुडणाऱ्या जगाला वाचविण्यासाठी, धर्मपालनासाठी, भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घेण्याची तुकाराम महाराजांची तयारी होती. त्यांच्या या कार्याचे स्वरूप अभंगांतून स्पष्ट दिसते--



Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

१) धर्माचे पाळन। करणे पाखंडखंडन।
हेचि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम ॥[१५]
२) आम्ही वैकुंठवासी। आलो याची कारणासी।
बोलीले जे ऋषी। साच भावे वर्ताया ॥[१६]
३) बुडते हे जग न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणवूनी ॥[१७]

वरील सर्व उक्तीवरून संत तुकारामांच्या अंतकरणात लोकोद्धाराची प्रेरणा होती, हे स्पष्टपणे दिसते. ज्ञान, भक्ती, कर्म आणि योग या मोक्ष प्राप्तीच्या मार्गात केवळ भक्तीच श्रेष्ठ आहे. संत तुकारामांनी केलेली लोकजागृती सामाजिकदृष्ट्या अधिक मूलगामी आणि महत्वाची असल्यानेच ते ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ या संत मालिकेत संत श्रेष्ठ ठरतात.

**समर्थ रामदास स्वामी**

मुसलमानाने केलेल्या अत्याचारांचा निषेध करताना संत रामदासांनी तिखट वाणीमध्ये पुढील उपदेश तत्कालीन महाराष्ट्रातील लोकांना केला. हिंदूंनी आपली संस्कृती, धर्म, मंदिरे व देव यांचे संरक्षण, ऐक्य, शौर्य व मुत्सद्देगिरीच्या बळावर करावी, अशी शिकवण त्यांनी सर्वसामान्य लोकांना दिली-

देवद्रोही तितके कुत्ते। मारुनी घालावे परोते।
देवदास पावती फत्ते। येदर्थी संशय नाही ॥
मराठा तेतुका मेळवावा। आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥[१८]

'दासबोध' आणि मनाचे श्लोक यातून त्यांनी लोकांना सद्विचार व सद्वर्तन यांची शिकवण दिली. बलोपासनेसाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे उभारली. लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकवले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे', हा संदेश त्यांनी लोकांना दिला. रामदास स्वामींनी लोकांना संघटना करण्याची व अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची स्फूर्ती दिली.

**समारोप व निष्कर्ष**

सर्व संतांनी समाजप्रबोधनासाठी लोकभाषा म्हणजे मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर केला. कारण त्यांना सामान्य जनांपर्यंत ईश्वर उपासनेचा मार्ग पोहोचवायचा होता. त्यासाठी संत ज्ञानेश्वर म्हणतात- " माझा मऱ्हाटीची बोल कौतुके ।

परी अमृताते पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मिळवीन।[१९]

संस्कृत भाषेतील ज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहचत नसल्याने त्यांना खरा धर्म आणि धर्माची शिकवण समजत नव्हती. शिक्षण ही उच्चवर्णियांची मक्तेदारी होती. म्हणून लोकशिक्षणासाठी त्यांचीच भाषा संतांनी अतिशय उपयुक्त मानली.

भक्तीच्या मेळाव्यात सर्वलोक समान आहेत. सर्व माणसे एकाच पांडुरंगाची लेकरे आहेत. सर्वांना ईश्वरभक्तीचा समान अधिकार आहे. म्हणून सर्वांनी एकमेकांशी बंधूभावाने वागले पाहिजे, अशी सर्व मध्ययुगीन मराठी संत मंडळींची शिकवण होती. आपली शिकवण लोकांपर्यत पोहचविण्यासाठी त्यांनी कीर्तन, प्रवचन यांचा मार्ग अवलंब केला. मराठी संतांनी अनेक तत्त्वविवेचानात्मक ग्रथ, टीकात्मक ग्रंथ आणि काव्यग्रंथ यांची रचना केली. तसेच अभंग, ओव्या, भारुडे, गवळणी यांची रचना केली. सर्व सामान्यांना समजेल अशी दैनदिन जीवनातील, सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक उदाहरणे घेऊनह्या रचना लोकांपर्यंत पोहचविल्या.

प्रपंच व परमार्थ हा एकत्रितपणे केला जाऊ शकतो, हे समजून सांगितले. त्यासाठी बायको, मुले-बाळे, घर-दार त्यागण्याची गरज नाही. तसेच आपले दैनदिन काम करता असतानाही आपण देवाची भक्ती करू शकतो. आपण करीत असलेले काम प्रामाणिकपणे केले म्हणजे देवाची भक्ती केल्यासारखे आहे. अशी अतिशय साधी, सोपी आणि सरळ मार्गी शिकवण सर्व मध्ययुगीन मराठी संत मंडळींनी समाजातील लोकांना दिलेली आहे. ही शिकवण आज ७००-८०० वर्षे झाले महाराष्ट्रातील लोकांना जगण्यासाठी उर्जा प्रदान करत आहे. महाराष्ट्रातील सामाजिक एकतेचे, मराठी संस्कृतीच्या शाश्वततेचे, मराठी लोकांच्या मनात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचे सर्व श्रेय हे मध्ययुगीन महाराष्ट्रातील मराठी संतांना जाते.

**संदर्भ:-**

१) पाटील शं. वि., वारकरी पंथाचा इतिहास, चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बु, मलकापूर, १९९५, पृ. क्र. १८-१९



Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

March 2024 Special Issue 11 Volume II (B)

SJIF Impact- 5.67

२) गोसावी र. रा., पाच भक्तीसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८, पृ. क्र. १९३

३) सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०, पृ. क्र. ५२

४) दातार आरती, महाराष्ट्रातील संत-परंपरा, डायमंड पाब्लीकेशन्स, पुणे, २०१०, पृ. क्र. १७-१८

५) सरदार गं. बा., उपरोक्त, पृ. क्र. ५२

६) सरकटे सदाशिव, सोलापूर सुशीला, मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (आरंभ ते १८००), कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१५, पृ. क्र. १८२

७) दातार आरती, उपरोक्त, पृ. क्र. ३१-३४

८) कित्ता, ३५

९) सरकटे सदाशिव, सोलापूर सुशीला, उपरोक्त, पृ. क्र. २०८

१०) दातार आरती, उपरोक्त, पृ. क्र. ४४-४७

११) सरदार गं. बा., उपरोक्त, पृ. क्र. ९०-९१

१२) पाटील शं. वि., उपरोक्त, पृ. क्र. १२०-१२१

१३) दातार आरती, उपरोक्त, पृ. क्र. ७२

१४) कुलकर्णी अ. रा., महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे,२००८, पृ. क्र. ३०

१५) सरदार गं. बा., उपरोक्त, पृ. क्र. १०९

१६) चौधरी प्रशांत, समग्र मराठी वाङ्मयाचा संक्षिप्त इतिहास, खंड पहिला, प्रारंभ ते १९२० पर्यंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०२०, पृ. क्र. ८८

१७) गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. क्र. १९३

१८) पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९९ पृ. क्र. १६

१९) कुलकर्णी अ. रा., उपरोक्त,पृ. क्र. ३०



Scanned with OKEN Scanner